दै लोकमत (७)

# उपजिल्हाधिकाऱ्यांची पाच पदे रिक्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड:** मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांचा शोध सुरु झाला आहे. जिल्ह्यात आजघडीला उपजिल्हाधिकाऱ्यांची पाच पदे तर तहसीलदारांची तीन पदे रिक्त आहेत.

ऑक्टोबर २०१७ मध्ये मनपाची निवडणूक होत आहे. त्यानुषंगाने प्रशासकीय तयारीला वेग आला आहे. महापालिका प्रशासनाने विभागीय आयुक्तांकडे आठ उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी तसेच सहायक निवडणूक अधिकारी म्हणून तितकेच तहसीलदार आवश्यक आहेत. महसूल अधिकाऱ्यांची संख्या पाहता मंजूर १६ उपजिल्हाधिकारी पदांपैकी ५ पदे रिक्त आहेत. त्यात उपविभागीय अधिकारी कंधार, किनवट, हदगाव, उपजिल्हाधिकारी निवडणूक आणि उपजिल्हाधिकारी भू-संपादन तर तहसीलदार माहूर, सामान्य प्रशासन आणि संजय गांधी निराधार योजनेच्या तहसीलदारांचा समावेश आहे. तहसीलदारांची २२ पदे मंजूर आहेत.